**ठळक बातम्या**

- मालदीवला ४० कोटी डॉलर्सचं अर्थसहाय्य देण्याचा भारताचा निर्णय
- २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास
- जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीची उद्या मतमोजणी, सुरक्षा व्यवस्था सज्ज
- भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांची पैसे हस्तांतरण यंत्रणा एकमेकांशी जोडण्याचे प्रयत्न सुरू असल्याची मंत्री पीयूष गोयल यांची माहिती
- पश्चिम बंगालमधल्या बिरभूम जिल्ह्यात कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात सात जणांचा मृत्यू

**आणि**

- यंदाचा वैद्यकशास्त्रातला नोबेल पुरस्कार व्हिक्टर अँब्रोस आणि गॅरी रुवकुन या संशोधक जोडीला जाहीर

**<><><><><>**

मालदीवला ४० कोटी डॉलर्सचं अर्थसहाय्य देण्याचा तसंच तीन हजार कोटी रुपयांची परस्परांच्या चलनात अदला-बदल करण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भारताच्या दौऱ्यावर असलेले मालदीवचे राष्ट्रपती महम्मद मुईज्जू यांच्यात आज शिष्टमंडळ स्तरीय चर्चा झाली. त्यावेळी हा निर्णय झाला. याशिवाय भ्रष्टाचार रोखण्यासाठी द्विपक्षीय सहकार्याबाबतही दोन सामंजस्य करारांवर यावेळी स्वाक्षऱ्या झाल्या. मालदीवच्या न्यायालयीन अधिकाऱ्यांसाठी क्षमता विकास कार्यक्रम तसंच क्रीडा आणि योग व्यवहार क्षेत्रातल्या सहकार्याबाबतच्या दोन सामंजस्य करारांचं नुतनीकरण यावेळी झालं.

दोन्ही देशांमधल्या सहकार्याला धोरणात्मक दिशा देण्यासाठी व्यापक, आर्थिक आणि सागरी सुरक्षा भागिदारीचा दृष्टीकोन दोन्ही देशांनी स्वीकारला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चर्चेनंतर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नक्षलवादाने कोणाचंही भलं झालेलं नाही. नक्षलवादी मार्ग चोखाळणाऱ्या सर्वांनी मुख्य प्रवाहात येऊन शस्त्रांचा त्याग करावा असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं आहे. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झाली, त्यानंतर ते बोलत होते. नक्षलवादी कारवायांविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असून सर्व घटकांकडून सहकार्य मिळाल्यास मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.  महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडीशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री बैठकीत उपस्थित होते. नक्षली कारवायांची संख्या १६ हजारावरुन सात हजार सातशेवर उतरली असून नक्षली हल्ल्यात नागरिकांचा मृत्यू होण्याच्या घटनांमधे ७० टक्के घट झाली आहे, असं शाह म्हणाले.

चालू वर्षात २०२ नक्षली अतिरेकी सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकींमधे मारले गेले तर ८१२ अतिरेक्यांना अटक झाली. या वर्षात ८१२ नक्षल्यांनी शरणागती पत्करली असून नक्षलप्रभावित जिल्ह्यांची संख्या आता ३८ वर  उतरली आहे. अशी माहिती गृहमंत्रालयाने दिली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात यश आलं आहे. २०१३ च्या तुलनेत सध्या राज्यात केवळ १० टक्के नक्षलवादी शिल्लक असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. प्रथमच गडचिरोली जिल्ह्याचा उत्तर भाग सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त झाला असल्याचं ते म्हणाले. केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या होणार आहे. मतमोजणी सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आल्याची माहिती जम्मू आणि काश्मिरचे मुख्य निवडणूक अधिकारी पांडुरंग पोळे यांनी सांगितलं. स्ट्राँग रुम आणि मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. सर्व मतमोजणी केंद्रावर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, राज्य सशस्त्र पोलीस दल आणि जिल्हा पोलीस दलाच्या तुकड्या तैनात केल्या आहेत.

**<><><><><>**

समाजातल्या सर्वांना सरकारकडून आरोग्य सुविधा मिळाव्यात यावर सरकारचा भर आहे, असं केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आज म्हणाले. जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिया विभागाच्या समितीच्या ७७ व्या सत्राला त्यांनी संबोधित केलं. या सत्राच्या अध्यक्षपदी आज त्यांची निवड झाली. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजनेचा लाभ १२ कोटी कुटुंबांना मिळाला असून प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार दिले जात असल्याची

माहिती त्यांनी दिली. जागतिक पारंपरिक औषध केंद्राच्या स्थापनेसाठी जागतिक आरोग्य संघटनेला भारतानं पाठिंबा दिला आहे असं ते म्हणाले.

<><><><><>

सरकार देशातली शेती संस्कृती सुधारण्यासाठी काम करत असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत सांगितलं. शेतकरी आणि शेतकरी संघटनांच्या बैठकीनंतर ते बोलेत होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने कृषी विकास योजना, फसल विमा योजनासारखे निर्णय घेतल्याचा पुनरुच्चारही चौहान यांनी यावेळी केला.

<><><><><>

भारताची UPI आणि संयुक्त अरब अमिरातीची AANI पैसे हस्तांतरण यंत्रणा एकमेकांशी जोडण्याचे दोन्ही देशांचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळं संयुक्त अरब अमिरातीमध्ये राहणाऱ्या ३० लाख भारतीयांना सहजपणे भारतात पैसे पाठवता येतील, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. भारत आणि UAE उच्च स्तरीय संयुक्त कृती दलाच्या १२ व्या बैठकीनंतर मुंबईत ते वार्ताहरांना संबोधित करत होते. UAE नं भारतात फूडपार्क स्थापन करायची तयारी दाखवली आहे. यात येत्या २-अडीच वर्षात २ अब्ज डॉलरची गुंतवणूक अपेक्षित आहे. यामुळं UAE मध्ये खाद्यसुरक्षा येईल, भारतीय शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढेल आणि भारतीय युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील, असं गोयल यावेळी म्हणाले.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या बिरभूम जिल्ह्यात कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात सात जणांचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले आहेत. भदुलिया खाणीत

स्फोट करण्याची तयारी सुरू असतानाच हा अपघात झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून पोलीस प्रकरणाचा तपास करत आहेत.

**<><><><><>**

यावर्षीचा वैद्यकशास्त्रातला नोबेल पुरस्कार व्हिक्टर अँब्रोस आणि गॅरी रुवकुन या संशोधक जोडीला जाहीर झाला आहे. मायक्रो आरएनए आणि जनुकीय हालचालींच्या नियंत्रणात त्याची भूमिका या शोधाबद्दल त्यांना हा ११ लाख अमेरिकी डॉलर्सचा हा पुरस्कार मिळाला असल्याचं नोबेल पुरस्कार देणाऱ्या कॅरोलिन्स्का इन्स्टीट्यूटनं जाहीर केलं. जीवाची वाढ आणि कार्य समजण्यात या शोधामुळे मदत होते. १९०१ पासून देण्यात येणाऱ्या नोबेल पुरस्कारांचं हे ११५वं वर्ष आहे. भौतिकशास्त्रासाठीचा पुरस्कार उद्या तर रसायनशास्त्रासाठीचा पुरस्कार परवा म्हणजेच येत्या बुधवारी जाहीर होईल.

**<><><><><>**

चेन्नईमध्ये काल हवाई दलाच्या प्रात्यक्षिकांनंतर मृत्यू पावलेल्यांच्या वारसांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय तामिळनाडू सरकारनं घेतला आहे. एकूण ५ जणांचा काल चेन्नईमध्ये मृत्यू झाला. उष्णता आणि वैद्यकीय कारणांमुळे नागरिकांचे प्राण गेले. यापुढे अशाप्रकारचे कार्यक्रम आयोजित करताना योग्य काळजी घेतली जाईल, अशी माहिती तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्र सरकारनं सर्व सहकारी संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक पुढे ढकलली आहे. विधानसभा निवडणुकीमुळे ३१

डिसेंबरपर्यंत या निवडणुका पुढे ढकलत असल्याचा शासन आदेश सरकारनं आज जारी केला. अडीचशे पेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयाने आदेश दिलेल्या सहकारी संस्थाच्या निवडणुका नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील, असंही सरकारनं या आदेशात स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्या नवी दिल्ली इथं ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं वितरण होणार आहे. या सोहळ्यात प्रसिद्ध अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

**<><><><><>**

भारताची जिम्नॅस्टिकपटू दीपा कर्माकर हिनं व्यावसायिक जिन्मॅस्टिक्समधून निवृत्तीची घोषणा केली आहे. या खेळासाठी लागणारी शारीरिक तंदुरुस्ती राखणं शक्य नसल्यानं २५ वर्षांच्या कारकीर्दीनंतर दीपा जिम्नॅस्टिक्सचा निरोप घेत आहे. खूप विचार केल्यानंतर मी हा निर्णय घेतला आहे. तो घेणं सोपं नव्हतं, पण हीच यासाठीची योग्य वेळ असल्याचं तिनं समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून माजी क्रिकेटपटू सनथ जयसूर्या यांची निवड झाली आहे. श्रीलंका क्रिकेटच्या कार्यकारी समितीने हा निर्णय घेतल्याची माहिती प्रसारमाध्यमांना दिली. नुकत्याच झालेल्या भारत, इंग्लंड तसंच न्यूझीलंडविरुद्धच्या दौऱ्यांमध्ये संघाची कामगिरी लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचं समितीने सांगितलं आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत जयसूर्या हे श्रीलंकेच्या संघाचे प्रशिक्षक असतील.

**<><><><><>**

यंदाचा विष्णुदास भावे पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर झाला आहे. सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचं स्वरूप- गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, आणि स्मृतीचिन्ह असं आहे. रंगभूमी दिनाचं औचित्य साधून येत्या ५ तारखेला १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल यांच्या हस्ते हे गौरव पदक देण्यात येणार आहे.